# ‘तुम्हीच संपादक व्हा व जाहिरात निर्मिती स्पर्धा’ निर्णय व परीक्षकांचे मनोगत

**‘तुम्हीच संपादक व्हा’ हस्तिलिखित स्पर्धा - २००७ - निर्णय**

**किशोर गट – (इयत्ता ५ वी ते ८ वी )**

**प्रथम क्रमांक : धूम विज्ञानाची** – इंद्रधनू गट – अहमदनगर

**द्वितीय क्रमांक : मोरपिस** – लक्ष्मणराव आपटे प्रशाला, पुणे

**तृतीय क्रमांक : गोपाळकाला** – लालबहादूर शास्त्री विद्यालय, उद्‌गीर

**उत्तेजनार्थ : १. पालवी** – अहिल्यादेवी प्रशाला, पुणे

**२. चैत्रपालवी** – विद्या विकास सभेचे माध्यमिक विद्यालय, बोरिवली, मुंबई

**विशेष गुणवत्ताप्राप्त हस्तलिखिते: १. तारांगण २.गरुडझेप ३.स्पंदन.** सर्व, ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे **४. मिळूनी सारे लिहू या** – मधुरा लोंढे गट, पुणे **५. देवाशिष** – बाल शिवाजी विद्यालय, अकोला **६. पाझर** – तात्यासाहेब सामंत विद्यालय, चाळीसगांव

**याशिवाय स्पर्धेत सहभागी झालेले गट/शाळा– १.** ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे (६). २. बीमानगर विद्यालय, बोरिवली ३. स्वयंज्योती संघ, बार्शी ४. अंकुर विद्यामंदिर, भंडारा ५. सरस्वती सेकंडरी स्कूल, ठाणे ६. लक्ष्मणराव आपटे प्रशाला, पुणे ७. तात्यासाहेब सामंत विद्यालय, चाळीसगांव ८. बालशिक्षण मंदिर, पुणे ९. विवेकानंद विद्यालय, चोपडा, १०. राजा धनराजगिरजी हायस्कुल, पुणे ११. आर.सी.एम्. सेकंडरी स्कूल, कुरुळ १२. उत्तमचंद राजेश्वर स्कूल, अकोला

(सर्व पारितोषिकप्राप्त आणि विशेष गुणवत्ताप्राप्त हस्तलिखितांच्या शाळा किंवा गटांना वर्षभर छात्र प्रबोधनचा अंक पाठवला जाईल. एखाद्या शाळेची एकाहून अधिक हस्तलिखिते असल्यास, त्यांना एकच अंक पाठवला जाईल.)

प्रिय मित्रमैत्रिणींनो,

शब्दांच्या बागेत एकदा मी खेळत होते, पडत होते, धडपडत होते. शब्दांचं छान तळं झालं, त्याने सर्वांना वेड केलं. आता माझ्या ओंजळीत थोडेच शब्द राहिले होते. त्यांना मी सोडून दिलं आकाशात ! ते पाहून लोक म्हणाले,‘‘पंख फुटले शब्दांना’’, अशा प्रकारचे तुमचे छान छान विचार, नवनवीन कल्पनांनी बहरलेलं लेखन वाचताना आम्हाला अतिशय आनंद झाला. वाचतानाच नकळत मुखातून शब्द येत होते, वा! फारच छान! शाब्बास!

महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यातून किशोर गटासाठी (५वी ते ८ वी ) तुम्ही २९ हस्तलिखिते पाठवून उत्तम प्रतिसाद दिलात. हस्तलिखित तयार करण्यासाठी तुम्ही सर्व, गट करून एकत्र जमला असाल. चांगले लेखन मिळविण्यासाठी धडपडला असाल. तुमची चित्रकला आणि सौंदर्यदृष्टी आम्हाला हस्तलिखिते वाचताना जाणवत होती. तुम्ही आपापले हस्तलिखित उत्तम प्रकारे तयार केले आहे, हे आम्हाला जाणवत होते. या हस्तलिखितातून विद्यार्थी लेखकांनी अनेकविध विषयांना स्पर्श केला आहे. पुण्यातले खड्डे हा विषयसुद्धा मुलांच्या हातून सुटला नाही. याशिवाय टेस्ट ट्युब बेबी, भूकंप, पर्यावरण, हर्बेरियम वगैरे विषयांवर लेख चांगले आहेत. ‘स्पंदन’ मधील लक्ष्य, ‘अक्षरशिल्प’ची मुखपृष्ठावरील कविता, ‘काँक्रीटची चूल’ मधील पावसाळा, ‘वाचनवेडा बालक’ मधील दप्तर, ‘मंथन’मधील मौजमजा, ‘धूम विज्ञानाची’ मधील आवर्तन या कविता उल्लेखनीय वाटल्या.

प्रवासवर्णनांमध्ये, ‘ शब्दगोंधळ’ मधील पांडवलेणी, ‘गोपाळकाला’ मधील केरळप्रवासवर्णन, चांगली वाटली.

‘पालवी’मधील सा रे ग म प साठी पत्र, ‘धूम विज्ञानाची’ मधील मेंदूवडा ही कल्पना चांगली वाटली.

विविध क्षेत्रांतील व्यक्तींच्या मुलाखती विद्यार्थ्यांनी घेतल्या आहेत. 'धूम विज्ञानाची ' मधील डॉ. सुलभा ब्रह्मनाळकर यांची विद्यार्थ्यांनी फोनवरून घेतलेली मुलाखत, 'पाझर'मधील गोवा मुक्ति संग्रामातील वीर मोहन रानडे यांची मुलाखत या विशेष वाटल्या.

पुस्तक परीक्षणात 'मिळून सारे लिहू या', मधील तोत्तोचान, 'तेजोनिधी'मधील राधेय या पुस्तकांचे परिचय चांगले झाले आहेत. कथालेखनात 'अंकुर'मधील सशाची चंद्रावर स्वारी, 'गरुडझेप' मधील ज्योतीने ज्योत लावा, 'वाटचाल'मधील शौर्यकथा, 'विवेक'मधील पाखरांनो परत फिरा, या उल्लेखनीय कथा आहेत.

'चैत्रपालवी' अंकातील सजावट, चित्रे कलात्मक आहेत. 'मोरपीस' मधील मोगरा ही चित्रकथा विशेष वाटली. एकूण चित्रकथा या प्रकाराकडे कोणी लक्ष दिलेले नाही. जाहिरातीसुद्धा अधिक कल्पक, कलात्मक हव्यात.उत्तम हस्ताक्षर व शुद्धलेखनाकडे लक्ष द्यायला हवे. पानपूरकांमध्ये विनोद भरपूर आढळले; परंतु कोडी व इतर माहितीच्या चौकटी कमी होत्या.

स्पर्धा असल्याने नियमांचे काटेकोर पालन हवेच. अनेक हस्तलिखितांवर पृष्ठक्रमांक नाहीत, काहींनी चाळीसऐवजी साठ-सत्तर पानांची हस्तलिखिते केली आहेत. एका अंकाचे संपादक तर शिक्षकच झाले आहेत. मोठ्या माणसांचे फक्त मार्गदर्शन अपेक्षित आहे. बाकी सर्व कृती विद्यार्थ्यांनी करणे महत्त्वाचे आहे.

मुलांनो, या स्पर्धेमध्ये तुम्ही उत्तम कामगिरी केल्याबद्दल तुमचे अभिनंदन ! असेच लिहीत राहा !

**परीक्षक - सुखदा ऋषी, आश्लेषा महाजन,**
**नीलिमा करमरकर**

## 'तुम्हीच संपादक व्हा' हस्तलिखित स्पर्धा - २००७ - निर्णय

**कुमार गट - (इयत्ता ९वी ते १२ वी )**

**प्रथम क्रमांक : वाग्विभव -** ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी

**द्वितीय क्रमांक : आविष्कार -** प्रसाद सांडभोर गट, पुणे

**तृतीय क्रमांक : ज्ञानबिंदू -** आदर्श हायस्कूल, कुरतडे, रत्नागिरी

**उत्तेजनार्थ - उमलत्या कळ्या -** अहिल्यादेवी प्रशाला, पुणे

**विशेष गुणवत्ताप्राप्त हस्तलिखिते - १. प्रत्यंचा -** ज्ञान प्रबोधिनी नवगनगर विद्यालय निगडी **२. देवाशिष-** शिवाजी विद्यालय, अकोला **३.फुलोरा-** अभिजीत ज्ञानेश्वर भोसले गट, पंढरपूर **४. माणूस-** प्रतिभा वामन गट, निगडी प्राधिकरण **५. सरगम -** तात्यासाहेब सामंत वि. चाळीसगांव **६. स्वप्नलहरी -** शैलेंद्र एज्युकेशन, दहिसर

**याशिवाय स्पर्धेत सहभागी झालेले गट/शाळा-** १) देवळाली हायस्कूल, नाशिक.२) तात्यासाहेब सामंत विद्यालय, चाळिसगाव. ३) विवेकानंद विद्यालय, चोपडा. ४) आर्य चाणक्य विद्यालय, धाराशिव. ५) लालबहादूर शास्त्री विद्यालय, उदगीर. ६) विवेकानंद विद्यालय, फोंडा. ७) कल्पक गट, नागपूर.

'तुम्हीच व्हा संपादक' या हस्तलिखित स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून काम करताना खूप छान वाटले. प्रत्येक अंकाचे मुखपृष्ठ वेगळे ! सजावट, कल्पकता, नावापासूनची विविधता या सर्वच गोष्टी परिपूर्णतेकडे नेण्याची तुमची तळमळ जाणवत होती. आपला अंक चांगला व्हावा म्हणून तुम्ही सर्वांनीच खूप परिश्रम घेतलेत. त्याबद्दल अंकातील प्रत्येकाचे वैयक्तिक अभिनंदन!

स्वत:ची कल्पनाशक्ती वापरून लिहिलेल्या कथा, कविता असणारे अंक हे खरे सृजनशील अंक!

मात्र माहिती गोळा करून तीच उतरवून काढण्यातच अनेकांना रस आहे असेही दिसून आले.

चाळीसगांवच्या 'सरगम'ने स्वतंत्रपणे लिहिण्याचे धाडस दाखवले. तर नाशिकच्या 'प्रतिभेचा रंगझुला' ने बालकवी, गडकरी यांसारखे लेख पुस्तकातून जसेच्या तसे उतरवून काढल्याचे जाणवले. त्यात पुन्हा शुद्धलेखनाकडेही फारसे लक्ष दिलेले नाही.तरीदेखील एक महत्त्वाचे की,

मुलांना या पुस्तकांपर्यंत जावेसे वाटले. ‘ज्ञानबिंदू’ अंकाने अनेक विषयांना स्पर्श केल्याचे जाणवले.

‘उमलत्या कळ्या’चे हस्ताक्षर अत्यंत सुंदर. शिकवण ही कविता आणि जाहिरात मस्त!

पण ‘जोंधळ्याला चांदणे लखडून जावे’चे कवी मनोहर नव्हे तर, ना. धों . महानोर!‘ ज्ञानदीप’ अंकातील चित्र सुंदर! ‘फुलोरा’ तील ‘इजिप्त,एक अविस्मरणीय अनुभव’ व ‘मी पाहिलेला युरोप’ सुंदर प्रवासवर्णने !

‘स्वप्नलहरी’तील पऱ्यांची कविता गोड आहे. ‘नवशिल्प’ने अरुण शहाणेंची विस्तृत मुलाखत छान घेतली आहे.

काही साध्या विषयांवरील कविता, लेख खूप भावले – उदा. चाळीसगावच्या ‘सरगम’ मधील ‘न केलेला प्रवास’, व धाराशिवच्या ‘कल्पवेध’ मधील ‘बाबा’ ही कविता. ‘सरगम’ मधील ‘अहिराणीची गोडी’ या लेखातून आपल्या भागातील प्रादेशिक भाषेचा परिचय करून दिला आहे हे विशेष ! भ्रष्टाचार, पर्यावरण, माणुसकीचा अभाव इ. सामाजिक समस्यांना काही जणांनी स्पर्श केला आहे.

सरगम, वाग्‌विभव, प्रत्यंचा, स्वप्नलहरी, ज्ञानबिंदू, अभ्युदय, देवाशिष, प्रतिभेचा रंगझुला या हस्तलिखितांची मुखपृष्ठे वेधक आणि आकर्षक!

एकूणच तुमच्या लेखनानं आनंद दिला. तुमच्या उत्साहाचे कौतुक वाटले. यातूनच उद्याचा संपादक, लेखक, कवी, चित्रकार घडेल याची आशा आहे. त्यामुळे अंकाला बक्षीस मिळालं नाही तरी अजिबात नाराज होऊ नका. तुमचं बक्षीस हेच की तुम्हाला लिहिता आलं, लिहिण्याचा, अंक सजवण्याचा आनंद घेता आला. ज्यांना बक्षीस मिळालं त्यांचं मोठ्या मनानं अभिनंदन करा ! आणि पुढच्या वर्षासाठी नवं लेखन करायला आतापासूनच सुरुवात करा. त्यासाठी तुम्हा सर्वांना आमच्या मन:पूर्वक शुभेच्छा !

**परीक्षक : १. संगीता बर्वे २. अंजली नानल**
**३. शैलजा देशमुख**

## Be an Editor - इंग्रजी हस्तिलिखित स्पर्धा - २००७- निर्णय

**खुला गट : (इयत्ता ५ वी ते १० वी )**

**प्रथम क्रमांक : Zest** शिवानी श्रीनिवास भालचंद्र गट , औरंगाबाद.

**उत्तेजनार्थ: Ripple** तात्यासाहेब सामंत विद्यालय, चाळीसगाव, **The Image** - पी.जी. के.मंडळ हायस्कूल, पुणे.

**अन्य सहभागी हस्तलिखिते** – ज्ञानप्रबोधिनी, पुणे (२), सरदार दस्तूर हायस्कूल, पुणे.

सध्याच्या झपाट्याने पुढे जाणाऱ्या तांत्रिक युगात काही चांगल्या गोष्टी कालबाह्य होत चालल्या आहेत. हस्तलिखिते ही त्यातीलच एक गोष्ट. विद्यार्थ्यांना नवनिर्मितीचा आनंद घेता येणारा असा हा उपक्रम आहे. इंग्रजी हस्तलिखित स्पर्धेचे हे पहिलेच वर्ष असल्याने प्रतिसाद कमी मिळाला, परंतु स्पर्धेसाठी आलेल्या ६ हस्तलिखितात विद्यार्थ्यांचे कष्ट, उत्साह, जाणवत होता.

Zest : अंकातील Common Man's Common Day हा लेख परिणामकारक आहे. औरंगाबाद शहराची ओळख चांगली दिली आहे.

Ripple : या हस्तलिखिताचे मुखपृष्ठ छान आहे. अनेक रंगतरंग दाखवणारे, आशयाशी जोडले जाणारे वाटते.

The Image हस्तलिखिताचे संपादन कौशल्य चांगले आहे. शाळेचा परिचय आणि Location map, वह्यांची जाहिरात उल्लेखनीय आहे.

Zenith मधील Life ही कविता चांगली आहे. सरदार दस्तूर हायस्कूलने आपल्या हस्तलिखिताला शीर्षक दिलेले नाही.

एकंदर सर्वांचाच इंग्रजी हस्तलिखिताचा प्रयत्न चांगला आहे. परंतु स्पेलींगमधील चुका टाळायलाच हव्यात. व्याकरणाच्या दृष्टीने भाषेची अचूकता हवी. स्पर्धेच्या सर्व नियमांचे पालन काटेकोरपणे करायला हवे. अंकाला दिलेल्या शीर्षकाचा अर्थ समजून घेऊन त्याला अनुरूप मुखपृष्ठ तयार करावे. पुढील वर्षी यापेक्षा उत्तम दर्जाची आणि मोठ्या संख्येने स्पर्धेत उतरलेली हस्तलिखिते वाचायला मिळतील याची खात्री आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन !

**परीक्षक – लक्ष्मी गोखले, सुनंदा सहस्त्रबुद्धे**

## हस्तलिखितांची पारितोषिके देणाऱ्यांची नावे

**१. श्री. दिवाकर बाळकृष्ण बापट - यांनी कै. बाळकृष्ण दत्तात्रय बापट यांचे स्मरणार्थ.**

**२. सौ. ललिता लिखिते - यांनी कै. शं. रा. देवळे यांचे स्मरणार्थ.**

**३. श्रीमती निर्मला गोपाळ किराणे - यांनी कै. गो. म. किराणे यांचे स्मरणार्थ**

वरील देणगीदारांनी दिलेल्या देणगीच्या ठेवीवरील व्याजातून हस्तलिखित स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकांची पारितोषिके देण्यात आली आहेत. अन्य सर्व पारितोषिके 'छात्र प्रबोधन' तर्फे देण्यात आली आहेत. सर्व यशस्वी स्पर्धकांना पुस्तकरूपाने ही पारितोषिके पाठवली आहेत. त्यांनी त्याची पोच पाठवावी.

## जाहिरात स्पर्धा – एक सृजनशील अनुभव

छात्र प्रबोधनच्या रूपाने अंकात शालेय विद्यार्थ्यांना जाहिरात कशी करतात, कशी समजून घेतात आणि ती कशी असावी व नसावीही यावर सुनेत्रा मंकणी यांनी एक लेख लिहिला होता. त्या अनुषंगाने छात्र प्रबोधनने एक 'जाहिरात बनवा' अशी स्पर्धा घेतली. या स्पर्धेला पुण्याबरोबरच अकोला, उद्गीर, चाळीसगांव अशा विविध गावांतून अपेक्षेपेक्षाही जास्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेसाठी एकूण ७२ जाहिराती आल्या. जाहिरात तपासताना आम्हाला हा उत्साह जाणवत होता. विषय थोडे अवघड असले तरीही ते खूप छान हाताळले गेले. जाहिरातीला कॅप्शन किंवा मथळा हवा. उत्पादनाबद्दल थोडक्यात पण परिणामकारक शब्दात मजकूर (बॉडी कॉपी) हवा. ती वस्तू जास्त खपावी म्हणून सवलतीची योजना, फ्री देण्याची योजना ह्याचा विचार विद्यार्थ्यांनी समंजसपणे केला होता. रंगसंगती आणि चित्रकौशल्य ह्याचाही वापर आल्हाददायक होता. एकूणच; विद्यार्थ्यांचे मन हा आरसा असतो त्यात समाज जीवनाचे प्रतिबिंब हुबेहूब उमटते, या विचाराचा प्रत्यय यातून आला. चित्रकलेच्या अंगाने विचार करता, मुलांनी विविध रंगप्रकारांचा अभ्यास करायला हवा. अंतिम चित्र करण्याआधी त्याचं कच्चं रेखाटन करावं. अक्षरलेखनाला विविध पद्धती वापराव्यात. यासाठी वर्तमानपत्रातल्या, चांगल्या मासिकातल्या जाहिराती, चित्ररचना बघून त्यांचा अभ्यास करावा. चित्राची रंगसंगती, मांडणी यावर विचार करावा. मजकूर आणि चित्रे यांच्या प्रमाणात गल्लत नसावी. शाळेतील शिक्षकांच्या मदतीने रेखाटनाचा सराव करावा.

मुलांनी बघितलेल्या जाहिरातीचा परिणाम त्यांच्या चित्रावर, जाहिरातीवर झाल्याचे जाणवत होते. म्हणूनच या मुलांबरोबरच त्यांच्या पालकांना व शिक्षकांना एक सुचवावेसे वाटते की काही विधायक आणि चांगल्या गोष्टी त्यांच्यासमोर घडत राहिल्या, त्यांना घातक अशा गोष्टी आपण टाळत गेलो तर उद्याचा सक्षम, समर्थ आणि विधायक समाज ह्याच मुलांच्या हातून घडणार आहे. सर्व स्पर्धकांचे मन:पूर्वक अभिनंदन!

**परीक्षक–सुनेत्रा मंकणी, गिरीश सहस्रबुद्धे, सतीश देशपांडे**

## जाहिरात स्पर्धा - निर्णय २००७ - निर्णय

**प्रथम क्रमांक : रोहित हरिप** – ज्ञान प्रबोधिनी, पुणे,

**द्वितीय क्रमांक : प्रदीप पाटील** – तात्यासाहेब सामंत विद्यालय, चाळीसगांव

**तृतीय क्रमांक : श्रेया परांजपे** – अहिल्यादेवी हायस्कूल, पुणे,

**उत्तेजनार्थ – जिशान सिराज** – राजा धनराज गिरजी हायस्कूल, पुणे,

**अजिंक्य कानिटकर** – विमलाबाई गरवारे प्रशाला, पुणे




द्वितीय–प्रसाद सांडभोर गट, पुणे




प्रथम–ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी, पुणे




तृतीय–आदर्श हायस्कूल, कुरतडे, जि. रत्नागिरी

कुमार गट(नववी ते बारावी)

## आविष्कार उमलत्या प्रतिभेचा

## 'तुम्हीच व्हा संपादक' हस्तलिखित स्पर्धेतील विजेती हस्तलिखिते

किशोर गट(पाचवी ते आठवी)

द्वितीय–आपटे प्रशाला, पुणे




प्रथम–इंद्रधनू गट, अहमदनगर




तृतीय–लालबहादूर शास्त्री विद्यालय, उदगीर

